# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ०६.०९.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि ०५/०९/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ९५ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ६१,८५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.०५/०९/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयात एकुण ०१ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन १.२६ लिटर दारू असा एकुण ४९०/—रू.कि.चा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि ०५/०९/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ मोवाका अन्वये एकुण ०३ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.

**चोरी :—**दिनांक ०५/०९/२०२२ रोजी फिर्यादी बालाजी विठ्ठल गोरे रा.शिरडशहापुर ता.औढा ना.जि. हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे कुरूंदा येथे कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.०३. ०९.२२ रोजी चे ०२:०० ते ०५:०० वा  चे सुमारास मौजे शिरडशहापुर येथील आंबेडकर चौकात गणेश खेबाळे यांचे घरासमोर फिर्यादीची हिरो स्प्लेंडर कंपणीची मो.सा.क्र.एम.एच.३८ एक्स ३७९१ कि.३०,००० रू कोणीतरी अज्ञात चोरटयांनी चोरून नेली म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात कुरूंदा पोलीस तपास करित आहेत.

दिनांक ०५/०९/२०२२ रोजी फिर्यादी धवल श्रीपात दोडल व्य.व्यापार रा.नवा मोंढा हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे हिंगोली ग्रा. येथे कलम ४६१,३८० भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि. २४.०८.२२ रोजी चे १८:०० वा पासुन ते २६.०८.२२ रोजी चे दुपारी १२:००वा चे दरम्याण फिर्यादी यांचे मौजे लिंबाळा मक्ता एम.आय.डी.सी. येथील धवल इंटरप्रायजेस या दुकानाचे टिन शेड चे दक्षिणेकडील व उत्तरेकडील बाजुचे लोखंडी पत्राचे जोडाचे नट कापुन पत्रा फाकुन आत मध्ये प्रवेश करून १) दहा फुट लांबीचे ३६ नग लोखंडी पाईप कि.३५,००० रू२) २०० किलो आर.सि.ए.सिटचे कात्रण कि.२४,००० रू ३) ३०० किलो लोखंडी पाईप कि.२५,००० रू  ४) १५० वनज लोखडी कपाटाची शिट कि.१३,५०० रू ५) लोखंडी पाईप ३ इंची कि.१०,००० रू ६) लोखंडी प्लेट २८ किलो की.३,००० रू आसा एकुण १,१०,५०० रू मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरटयांनी चोरून नेला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हिंगोली ग्रा.पोलीस तपास करित आहेत.

**मरणास कारणीभुत असणा—या विरूध्द अपराध दाखल :—** दिनांक ०५/०९/२०२२ रोजी फिर्यादी विश्वभर शिवदास कल्याणकस्तुरे रा.पोखर्णी ता.कंधार जि.नांदेड यांचे फिर्यादी वरून पोस्टे कळमनुरी येथे कलम २७९,३०४अ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.०४.०९.२२ रोजी चे १८:३० वा चे सुमारास माळेगाव गावासमोर घोळवा पाटी जवळ फिर्यादीचा मुलगा चालवत असलेली मो.सा.क्र एम. एच.२६ बि.बि.२४५२ ने कळमनुरी येथे येत असतांना माळेगाव जवळील घोळवा पाटीजवळ आला असता त्याचे मो.सा.ला समोरून येणारे ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक एम.एच.४० सी.डी. १०६५ हा भरधाव वेगात व निष्काळाजीपणे चालवुन समोरून जोराची धडक दिल्याने फिर्यादीचा मुलगा

रोडवर पडुन डोक्यावरून चाक जावुन डोके फुटुन  फिर्यादीचे मुलाचे मरणास कारणीभुत झाला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात कळमनुरी पोलीस तपास करित आहेत.